# <u>महा सैनिक प्रशिक्षण केंद्र</u>

# <u>बुलढाणा</u>

१. सैनिक कल्याण विभाग पुणे यांनी नवीन महा सैनिक प्रशिक्षण केंद्र, बुलडाणा येथे उभे करून, दिनांक १५ जून २०१५ रोजी सुरु केले . आता ते प्रशिक्षण केंद्र या विभागात एक आदर्श प्रशिक्षण केंद्र बनलेले आहे . महा सैनिक प्रशिक्षण केंद्र, बुलडाणा हे सैन्यबल, केंद्रीय सशत्र पोलीस बल, पोलीस दल, त्याच बरोबर, खाजगी सुरक्षा एजेन्सी करिता सुरक्षा रक्षकासाठी प्रशिक्षण देते.

**<u>TOP VIEW</u>**



२. महा सैनिक प्रशिक्षण केंद्र हे महाराष्ट्र शासन पुरूस्कृत, माजी सैनिक महामंडळ अंतर्गत चालवण्यात येणारे प्रशिक्षण केंद्र असून महाराष्ट्रातील युवक, युवती जे शहरी, निमशहरी किंवा ग्रामीण भागात राहतात, त्यांना सैन्यबल, केंद्रीय सशत्र पोलीस बल, पोलीस दल, तसेच, सुरक्षा एजेन्सी करिता रक्षकासाठी प्रशिक्षण देते.

३. सुरक्षा रक्षक प्रशिक्षण हे भारत सरकारच्या प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन ) अक्ट २००५ आणि महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन ) रुल्स २००७ प्रमाणे दिले जाते. हे प्रशिक्षण अनुभवी व तज्ञ माजी सैनिकाद्वारे दिले जाते. या प्रशिक्षणामध्ये १०० तास शैक्षणिक आणि ६० तास मैदानी प्रशिक्षणाचा समावेश आहे. सुरक्षा प्रशिक्षण हे अद्यावत व प्रगत सुरक्षा उपकरनांची माहिती व प्रात्याक्षिके, तसेच, औद्योगिक कारखाना भेट, ‘ऑन जॉब ट्रेनिंग’ असे सर्व समावेशक प्रशिक्षण, सुरक्षा रक्षकांना दिले जाते.

४.  सैन्य बल,  केंद्रीय सशत्र पोलीस बल आणि  राज्य पोलीस दल यांचे भरतीपूर्व प्रशिक्षण सुद्धा दिले जाते. यामध्ये गणित , इंग्रजी , सायन्स , सामान्यज्ञान, चालू घडामोडी व मराठी या विषयांचा  समावेश आहे.

५.  तसेच, शारीरीक प्रशिक्षणामध्ये, १०० मीटर धावणे , १ मैल धावणे , लांब उडी , पूल अप्प्स , गोळा फेक यांचा समावेश आहे.

**PHYSICAL TRAINING GROUND**



६.  याशिवाय , मिनी जिम्नेशियम, व्हॉलीबॉल, टेनिस , केरम ,  बुद्धिबळ , इ. सुविधा दिल्या जातात. शैक्षणिक व शारीरिक क्षेत्रामध्ये प्रशिक्षणार्थी यांची परीक्षा, त्यांची पकड व क्षमता तपासण्यासाठी घेतली जाते. यामूळे प्रशिक्षणार्थीमध्ये अनेक क्षेत्रामध्ये स्पधेर्ची भावना निर्माण होते.

७.  प्रशिक्षण केंद्र तीन हाऊसेस मध्ये विभाजले आहे. त्यांची नावे शिवाजी , नेहरू आणि टिळक आहेत. ह्या  हाऊसेस मध्ये क्रॉसकंट्री , ड्रील व अभ्यासामध्ये स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्याचबरोबर, प्रशिक्षणार्थीना , टेलीविझन, लायब्ररी, मराठी  व इंग्लिश वर्तमानपत्रे, तसेच, सामान्यज्ञानाची मासिके, त्यांची सामाजिक व बौद्धिक पातळी वाढवण्यासाठी दिली जातात. याशिवाय, स्पष्ट बोलणे व लिहिण्याची क्षमता वाढवण्यासाठी, प्रशिक्षणार्थीना बातमी पत्रक व विविध विषयावर, दररोज प्रत्येकी  पाच मिनिटे बोलण्याची संधी दिली जाते.




८. महा सैनिक प्रशिक्षण केंद्रामधून प्रशिक्षणार्थींना सर्वोच्च दर्जाच्या सुविधा दिल्या जातात. प्रशिक्षणसेंटरमध्ये १२० ट्रेनिज प्रशिक्षण घेवू शकतात. ट्रेनिजसाठी ६० बंक बेड पूर्ण बिछान्यासाहित, ज्यामध्ये, मच्छरदानी, गादी, उशी, दोन बेडशिट व चादर यांचा समावेश आहे. तसेच गरम पाणी , चांगल्या बाथरूम्स, भोजनालय , शुद्ध फिल्टर केलेले पिण्याचे पाणी, टेलीविजन तसेच अद्यावत क्लास रूम ज्यामध्ये पावर पांईट प्रेझेनटेशन , पीए सिस्टम , लॅप टॉप या सुविधा असून सुरक्षा उपकरणामध्ये सीसीटीव्ही, इन्त्रुजन अलार्म सिस्टम, असेस कंट्रोल सिस्टम, फायर अलार्म सिस्टम, व्हीजीटर मनेजमेंट सिस्टम, व्हीडीओ डोअर फोन , वॉकी टॉकी सेट, डोअर फ्रेम मेटल डिटेक्टर या सुविधा असून महा सैनिक प्रशिक्षण केंद्रामधील सुरक्षा प्रयोगशाळा ही आधुनिक व परिपूर्ण प्रयोगशाळा आहे.



९.  सर्व प्रशिक्षण, या सुविधा पॉवर पाइन्ट प्रोजेक्टरतून दिले जाते.  महा सैनिक प्रशिक्षण केंद्र हे माजी सैनिक महामंडळ, पुणे  कल्याणकारी योजने अंतर्गत  प्रशिक्षण देणारे प्रशिक्षण केंद्र आहे. त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये चांगल्या प्रतिचे शिक्षण, भोजन आणि निवास दिला जातो .




१०. **<u>महा सैनिक प्रशिक्षण केंद्राचे यश</u>** –

अ)  ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत एकुण ७१ सुरक्षारक्षक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून, संपूर्ण महाराष्ट्रातील २९९४ युवक आणि युवती यांना सुरक्षा रक्षकाचे प्रशिक्षण दिले गेले आहे . त्यातील ९०% प्रशिक्षणार्थीना माजी सैनिक महामंडळ आणि अन्य सुरक्षा एजेन्सी मध्ये नोकरी मिळाली आहे.

ब)  ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत एकुण ६५ भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करून, त्यातील ९९१ युवक आणि युवती यांना सैन्य दल , केंद्रीय सशत्र पोलीस बळ आणि राज्य पोलीस दलात प्रशिक्षण दिले गेले आहे.  यशस्वी प्रशिक्षणार्थींची यादी संकेतस्थळवर उपलब्ध आहे.

क)  ०१ ऑगस्ट २०१६ पर्यंत महा सैनिक प्रशिक्षण सेंटरने, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या, पुणे यांच्या पर्यवेक्षकांना रिफ्रेशर सुरक्षा ट्रैनिंग कोर्सेचे प्रशिक्षण दिले.

## दूरदृष्टी

११. संपूर्ण भारतात महा सैनिक प्रशिक्षण केंद्र आदर्श केंद्रं राहील जे देशाला सुरक्षा रक्षक, पर्यवेक्षक, योद्धा व पोलीस दल देत राहील. भविष्यात देशाच्या सुरक्षेच्या आव्हानांना तोंड देवून, देशाला सुरक्षित ठेवतील व त्याचे सातत्य पुढेही ठेवले जाईल. ही दूरदृष्टी संपन्न होण्यासाठी, योजनापूर्वक काम व पुढील वाटचालीची कार्ये सफल होण्यासाठी, अडीअडचणींना तोंड देवून , सामर्थ्याने काम करण्याची आवश्यकता आहे.

## पुढील वाटचाल

१२. आम्ही, महा सैनिक प्रशिक्षण केंद्रा मध्ये, सर्वोच्च दर्जाचे व्यावसायिक, बौद्धिक , शारीरिक व नेतृत्व नीतीतत्वे यांचे प्रशिक्षण देऊ . यासाठी ,नवीन औद्योगिक कला व विज्ञानाचा अभ्यास देवून , देशासाठी कार्यक्षम सुरक्षा रक्षक, योद्धा व पोलीस, देशाच्या संरक्षणासाठी देत राहु .

१३. महा सैनिक प्रशिक्षण सेंटर नेहमी अद्यावत, आधुनिक तसेच मुलभूत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यावर जास्त जोर देऊ, ज्यामुळे, चांगले व योग्य वातावरण सद्य स्थितीसाठी आणि भविष्यासाठी कार्यरत राहील .

१४. आम्ही जे काही बनवले आहे त्याची देखभाल व उपलब्धी करून, चांगले शैक्षणिक वातावरण आज व भविष्यकाळासाठी निर्माण करू . अशा वातावरणाचे संगोपन करू, ज्यामध्ये, वैयक्तिक प्रगती, कल्याण व उच्च जीवनाच्या दर्जाची वाढ प्रशिक्षणार्थींना होईल, ज्यामुळे, महा सैनिक प्रशिक्षण केंद्राचे सर्व कुटुंब आनंदी व सदा उत्साही राहील.